0 2 FEB 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

ग्रामविकास



# आत्मनिर्भरतेला चालना मिळणार



**प्रा. डॉ. एम. एस. देशमुख**
शिवाजी विद्यापीठात
अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख

## ठळक तरतुदी

- 'शी-मार्टस', स्वयं-सहायता उद्योजक मार्टस स्थापणार
- एआय आधारित शेती साधने सुरू करणार
- उद्योग, नवोन्मेष व स्पर्धात्मक क्षमता वाढवणार
- मत्स्यपालनासाठीची साखळी बळकट करणार

रेटिंग

**वाढ, समावेश आणि सहनशीलता या तीन मूलभूत स्तंभांवर आधारित अर्थसंकल्प सादर करताना ग्रामीण विकासासाठी एकूण एक लाख ९४ हजार ३६९.८१ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. गेल्या आर्थिक वर्षातील (सुधारित अंदाज) १,८६,९९५.६१ कोटी रुपयांपेक्षा किंचित जास्त आहे. अर्थसंकल्पात ग्रामीण विकासाला विशेष प्राधान्य दिले आहे.**

यंदाच्या अर्थसंकल्पात उद्योग, नवोन्मेष व स्पर्धात्मक क्षमता वाढविण्यावर विशेष भर दिला आहे. कंटेनर उत्पादन, स्टार्टअप्स आणि नवउद्योग निर्मिती या क्षेत्रांवर लक्ष केंद्रित केले आहे. त्यासाठी निधी देण्याच्या धोरणात्मक निर्णयांमुळे देशातील उत्पादन, तंत्रज्ञान आणि रोजगारक्षेत्र मजबूत होण्याची अपेक्षा आहे. सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योगांना चालना देण्यासाठी दहा हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. या निधीच्या माध्यमातून कर्जसुलभता, तंत्रज्ञान आधुनिकीकरण, बाजार-जोडणी आणि रोजगारनिर्मितीला गती मिळणे अपेक्षित आहे. तथापि, निधीचा लाभ तळागाळातील उद्योजकांपर्यंत पोहोचण्यासाठी सोप्या प्रक्रिया, पारदर्शक अंमलबजावणी आणि वेळेत कर्जपुरवठा आवश्यक आहे.

## महिला उद्योजकतेस चालना

ग्रामीण आणि निमशहरी महिलांना उद्योजकतेस प्रोत्साहन देण्यासाठी 'शी-मार्टस' आणि स्वयं-सहायता उद्योजक मार्टस स्थापन करण्याचा प्रस्ताव महत्त्वाचा आहे. या 'मार्टस'मुळे महिला स्वयं-सहायता गटांना थेट बाजारपेठ उपलब्ध होईल. मध्यस्थांवरील अवलंबन कमी होईल आणि महिलांच्या उत्पन्नात स्थिर वाढ होईल. 'मार्टस'मधून महिलांसाठी व्यवसायाचे व्यासपीठ, ब्रँडिंग, विपणन आणि मूल्यवर्धनाच्या संधी निर्माण होते. त्यांचा प्रभाव वाढवण्यासाठी प्रशिक्षण, डिजिटल पेमेंट सुविधा, लॉजिस्टिक्स समर्थन आणि बाजार-जोडणी यांवर विशेष भर देणे आवश्यक आहे. महिला आर्थिक सक्षमीकरण, रोजगारनिर्मिती आणि समावेशक ग्रामीण विकास साध्य करण्यासाठी हे उपक्रम निर्णायक ठरू शकतात.

## आधुनिकीकरण व उत्पन्नाचे विविधीकरण

कृषी क्षेत्राच्या आधुनिकरणासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित साधने सुरू करण्याचा प्रस्ताव महत्त्वाचा आहे. परिणामी, शेती अधिक अचूक, खर्च-कार्यक्षम आणि उत्पादनक्षम बनेल. ए.आय आधारित शेतीचा लाभ सर्व शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशिक्षण, किफायतशीर तंत्रज्ञान, स्थानिक भाषांतील प्रणाली आणि डेटा संरक्षण आवश्यक आहे. यासोबतच, अल्पभूधारक आणि मध्यम शेतकऱ्यांसाठी पशुपालन क्षेत्रातील कर्जसंबंधित अनुदान योजना प्रस्तावित आहे, ज्यामुळे दुग्धव्यवसाय, शेळी-मेंढी पालन आणि कुक्कुटपालन यांना चालना मिळेल. या उपाययोजनांमुळे ग्रामीण रोजगारनिर्मिती, महिलांचा सहभाग आणि उत्पन्नाचे विविधीकरण साध्य होऊ शकते.

## ग्रामीण विकासाचे आयाम

अर्थसंकल्पात ग्रामीण विकास आणि रोजगाराला प्राधान्य दिले आहे. त्यामध्ये विकसित भारत ग्राम योजना हाती घेतली गेली आहे. सुमारे ९५ हजार कोटींच्या या योजनेतून ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवस्फूर्ती मिळेल. महात्मा गांधी ग्राम स्वराज उपक्रम खादी, हातमाग आणि हस्तकला उद्योगांना प्रोत्साहन देईल, तर ग्रामीण महिला, युवक आणि कुटुंबांना उत्पन्नाचे नवे स्रोत उपलब्ध होतील. ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी मत्स्यव्यवसाय आणि पशुधन क्षेत्राला विशेष प्राधान्य दिले आहे. यामध्ये ५०० जलाशयांचा (अमृत सरोवर) एकात्मिक विकास प्रस्तावित असून, मत्स्यपालनासाठी ही साखळी ग्रामीण रोजगार, स्थानिक बाजारपेठेतील समृद्धी आणि निर्यात संधी वाढविण्यात उपयुक्त ठरेल.

## ग्रामीण पायाभूत सुविधा आणि दळणवळण

ग्रामीण विकासाला गती देण्यासाठी पायाभूत सुविधा आणि कनेक्टिव्हिटी सुधारण्यावर भर दिला आहे. यामध्ये जलसंधारण, रस्ते, शाळा, हॉस्पिटल्स तसेच अन्य मूलभूत सुविधांचा समावेश आहे. ग्रामीण विद्युतीकरणासाठी आणि तंत्रज्ञान वापरासाठी ग्रामीण विद्युतीकरण महामंडळाची पुनर्रचना प्रस्तावित आहे. ज्यामुळे वीज पुरवठा अधिक विश्वसनीय, सातत्यपूर्ण आणि किफायतशीर बनेल. वाढती लोकसंख्या, महागाई आणि ग्रामीण गरजा लक्षात घेता या क्षेत्रातील निधी आणखी वाढवायला हवा.

0 2 FEB 2026

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सामाजिक विकासास अनुकूल अंदाजपत्रक

**अंदाजपत्रक हे देशाच्या सामाजिक आर्थिक विकासाचे प्रभावी साधन असते. त्यामुळे यंदाच्या आर्थिक वर्षात सरकारची विकासाची दिशा, व्याप्ती आणि गती काय असणार आहे, याचे प्रतिबिंब सरकारच्या अंदाजपत्रकात दिसते.**

**- प्रा. डॉ. पी. एस. कांबळे**

सामाजिक कल्याणासाठी या अंदाजपत्रकात गेल्यावर्षीच्या तुलनेत खर्चाची तरतूद वाढविली आहे. २०२५-२६ मध्ये सुधारित अंदाजपत्रकात सामाजिक कल्याणसाठी ५३ कोटी रुपये तरतूद होती, ती या अंदाजपत्रकात ६२, ३६२ कोटी रुपयांपर्यंत वाढविली आहे. ही स्वागतार्ह बाब आहे. सामाजिक विकासात शिक्षण आणि आरोग्याला महत्त्वाचे स्थान असते. या अंदाजपत्रकात शिक्षण आणि आरोग्यावरील निधी वाढविला आहे.



अन्वयार्थ

येत्या आर्थिक वर्षात शिक्षणापासून आरोग्यापर्यंत आणि उद्योग व्यवसायापर्यंत जाण्यासाठी आवश्यक शिफारशी करणाऱ्या उच्च अधिकार समितीची स्थापना केली जाणार आहे. नवीन आरोग्य विषयक संस्था स्थापन करण्यासाठी संलग्न आर्थिक व्यावसायिक संलग्न आरोग्य संस्थाची निर्मिती केली जाणार आहे. आरोग्याशी संबंधित व्यवस्था निर्माण करण्यासाठी दीड लाख बहुआयामी कौशल्य विकसित करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. आरोग्य पर्यटनासाठी एकूण पाच हब निर्माण करण्याचा प्रयत्न खासगी क्षेत्राच्या माध्यमातून हे अंदाजपत्रक करणार आहे. देश पातळीवरील आयुर्वेद आरोग्य संस्था निर्माण करून औषधे गुणवत्ता तपासण्याच्या प्रयोगशाळा अद्यावत करण्याचा मानस या अंदाजपत्रकात आहे. शिक्षणाच्या दृष्टीने राष्ट्रीय डिझाईन संस्था प्रामुख्याने पूर्व भारतात निर्माण केला जाणार आहे. देशाचे खेळातील योगदान वाढविण्यासाठी पायाभूत सुविधा कोचिंग विकास विज्ञानाने तंत्रज्ञान आधारित पायाभूत सुविधा विकास यावर प्रयत्न केला जाणार आहे.

एकूणच देशाच्या एकूण आर्थिक विकासात सामाजिक विकासाचे महत्त्व विचारात घेऊन विकास अधिक सर्वसमावेशक करण्याच्या दृष्टिकोनातून आणि सामाजिक कल्याण वाढविण्याचा प्रयत्न शिक्षण, आरोग्य, महिला, मुली यांच्या विकासाला प्राधान्य देण्याचा प्रयत्न हे अंदाजपत्रक करते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

02 FEB 2026

जनप्रवास



# शिक्षणपद्धतीमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता

## प्रा. डॉ. किरणकुमार शर्मा यांचे प्रतिपादन : प्रगत अनुदेशन पद्धती विषयावर दोन दिवसीय कार्यशाळा

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिक्षणशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत (पीएम. उषा) "प्रगत अनुदेशन पद्धती'' या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेचे ३० व ३१ जानेवारी रोजी आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी विभागाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. किरणकुमार शर्मा हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यावेळी त्यांनी सद्यस्थितीमध्ये बदलत्या सामाजिक गरजा लक्षात घेऊन शिक्षणपद्धतीमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता प्रतिपादित केली. याप्रसंगी शिक्षणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. चेतना प्र. सोनकांबळे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये प्रगत अनुदेशन पद्धतीचे महत्व विशद केले.

या दोन दिवसीय कार्यशाळेमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथील माहिती तंत्रज्ञान विभागाचे संचालक डॉ. नितीन पाटील, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ मुंबई येथील डॉ. महेश कोलतामे, शिक्षणशास्त्र विभाग सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथील डॉ वैभव जाधव, एमआयटी.एडीटी विद्यापीठ, पुणे येथील डॉ. प्रिया सिंग व प्राणीशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील प्रा. डॉ. एम. पी. भिलावे यांनी प्रगत अनुदेशन पद्धती या विषयावर तज्ञ म्हणून मार्गदर्शन केले. कार्यशाळेचे समन्वयक डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी इतिवृत्तांत सादर केला व सहसमन्वयक म्हणून सारिका पाटील यांनी कार्य पाहिले. सूत्रसंचालन बी. एड, एम. एड (एकात्मिक) प्रशिक्षणार्थी आकांक्षा पाटील व प्रांजली भोंग, किशोर शाम यांनी केले. प्रस्तुत कार्यशाळेसाठी अधिविगातील डॉ. रुपाली संकपाळ, शिक्षक, संशोधक, विद्यार्थी उपस्थित होते. सदर कार्यशाळेसाठी विविध शैक्षणिक संस्थेमधून ७४ प्रतिसादक उपस्थित होते.

0 2 FEB 2026

पुण्यनगरी

# लढणाऱ्यांना पाठबळ द्या

## रमेश गावस; पर्यावरण आणि प्रसारमाध्यमे विषयावर कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

पर्यावरणाचे प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत असले तरी देशात पर्यावरणाचे लढे उभे राहताना दिसत नाहीत. देशातील वातावरण अशा लढ्यांसाठी पोषक उरले नाही. तरीही काही जण नेटाने लढत आहेत. त्यांना पाठबळ मिळावे, अशी अपेक्षा गोव्यातील पर्यावरणाचे अभ्यासक रमेश गावस यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागात 'पर्यावरणीय लढे' या विषयावर ते बोलत होते.

दुसऱ्या सत्रात ज्येष्ठ पत्रकार प्रभाकर ढगे म्हणाले, जगभर तंत्रज्ञानाच्या विकासाची गती खूप आहे. हे तंत्रज्ञान आणि मानव यांच्यात सेतू तयार करावा लागेल. धोरण निश्चितीच्या पातळीवर पर्यावरणाला अग्रक्रम द्यावा लागेल. यासाठी पत्रकारांवर मोठी जबाबदारी आहे.

किर्लोस्कर ऑईल इंजिन आणि लक्ष्मी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम झाला. पर्यावरण अभ्यासक शरद आजगेकर, विनायक देसाई आदी उपस्थित होते. प्रास्ताविक मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, सूत्रसंचालन तेजश्री शिंदे यांनी केले. आभार जयप्रकाश पाटील यांनी मानले. यावेळी पत्रकारिता व जनसंवाद विभागाचे माजी प्रमुख डॉ. रत्नाकर पंडित, डॉ. अनमोल कोठाडिया, सुधाकर निर्मळे, डॉ. सुमेधा साळुंखे, शहीद वीरपत्नी लक्ष्मी महाविद्यालयातील शिक्षक, पत्रकार आणि विद्यार्थी उपस्थित होते.

0 2 FEB 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nimit Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# देशाच्या जनसांख्यिकीय लाभांशाची पोषकता वाढविण्यासाठी प्रगत अनुदेशन पद्धतीद्वारे कौशल्य निर्मितीची गरज" : प्रा.डॉ.किरणकुमार शर्मा



**कोल्हापूर, (महा न्यूज अँण्ड व्ह्यूज) :**

शिक्षणशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ ,कोल्हापूर येथे प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत (पीएम.उषा) ''प्रगत अनुदेशन पद्धती'' या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेचे दि ३० व ३१ जानेवारी रोजी आयोजन करण्यात आले होते . यावेळी कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी विभागाचे प्रभारी संचालक प्रा.डॉ.किरणकुमार शर्मा हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.त्यावेळी त्यांनी सद्यस्थितीमध्ये बदलत्या सामाजिक गरजा लक्षात घेऊन शिक्षणपद्धतीमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता प्रतिपादित केली.

याप्रसंगी शिक्षणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ.चेतना प्र.सोनकांबळे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये प्रगत अनुदेशन पद्धतीचे महत्व विशद केले.

या दोन दिवसीय कार्यशाळेमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ,पुणे येथील माहिती तंत्रज्ञान विभागाचे संचालक डॉ.नितीन पाटील ,श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ मुंबई येथील डॉ.महेश कोलतामे, शिक्षणशास्त्र विभाग सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथील डॉ वैभव जाधव,एमआयटी.एडीटी विद्यापीठ,पुणे येथील डॉ.प्रिया सिंग व प्राणीशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर येथील प्रा.डॉ .एम.पी.भिलावे यांनी प्रगत अनुदेशन पद्धती या विषयावर तज्ञ म्हणून मार्गदर्शन केले.

कार्यशाळेचे समन्वयक डॉ.विद्यानंद खंडागळे यांनी कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी इतिवृत्तांत सादर केला व सहसमन्वयक म्हणून सारिका पाटील यांनी कार्य पाहिले. सूत्रसंचालन बी.एड ,एम.एड (एकात्मिक) प्रशिक्षणार्थी आकांक्षा पाटील व प्रांजली भोंग, किशोर शाम यांनी केले. प्रस्तुत कार्यशाळेसाठी अधिविगातील डॉ.रुपाली संकपाळ,शिक्षक ,संशोधक, विद्यार्थी उपस्थित होते.सदर कार्यशाळेसाठी विविध शैक्षणिक संस्थेमधून ७४ प्रतिसादक उपस्थित होते.

02 FEB 2026

सकाळ




कोल्हापूर : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा संघ शुक्रवारी अमरावतीला रवाना झाला. संघासोबत उपस्थित डॉ. शरद बनसोडे, प्रा. विनायक जाधव.

# राष्ट्रीय सॉफ्टबॉल स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा संघ रवाना

**कोल्हापूर :** अमरावती येथे १ ते ५ फेब्रुवारी दरम्यान होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा संघ आज रवाना झाला. या संघात रोहन बाबर (कर्णधार), वैभव गाडे, अनिकेत गुजले, आशुतोष मिश्रा, विश्वजित ठोंबरे, प्रेम लालबेग, श्रुतिक पाटील, प्रथमेश गोरे, संस्कार माळी, पार्थ शिंदे, अनिकेत कदम, पृथ्वीराज अर्जुन, नीलेश रिळेकर, ओमकार नेर्लेकर, राजवर्धन पाटील, तुषार बाबर यांचा समावेश आहे. प्रशिक्षक म्हणून प्रा. विनायक जाधव काम पाहणार आहेत. संघाला प्रभारी कुलगुरु डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
0 2 FEB 2026 जनप्रवास शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कार्बन फूटप्रिंट भविष्यात शाश्वत विकासाचा आधारस्तंभ ठरेल : डॉ. बुरसे

जनप्रवास : जयसिंगपूर

ऊर्जा, वाहतूक, शेती व शहरीकरण क्षेत्रातील बदलांमुळे भविष्यात कार्बन फूटप्रिंट ही संकल्पना पर्यावरण संरक्षणासाठी निर्णायक ठरणार असल्याचे प्रतिपादन पर्यावरण अभ्यासक डॉ. महावीर बुरसे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व जयसिंगपूर कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मौजे धरणगुत्ती येथे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिरात "पर्यावरण व शाश्वत विकास" या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. खळदकर होते.

डॉ. बुरसे यांनी कार्बन क्रेडिट व कार्बन फूटप्रिंटच्या वाढत्या महत्त्वावर प्रकाश टाकत दैनंदिन जीवनातून होणाऱ्या कार्बन उत्सर्जनाचे मोजमाप भविष्यात अनिवार्य ठरणार



धरणगुत्ती : येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना महावीर बुरसे.

असल्याचे सांगितले. यासाठी कार्बन फूटप्रिंट कॅल्क्युलेटरचा वापर होणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

स्वागत व प्रास्ताविक प्रा. डॉ. प्रभाकर माने व पाहुण्यांची ओळख निलोफर नदाफ यांनी करून दिली. सूत्रसंचालन देवश्री जाधव यांनी केले. आभार तन्मय पोतदार यांनी मानले. प्राचार्य डॉ. सुरत मांजरे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

यावेळी एन. एस. एस. समिती सदस्य प्रा. सत्यजित माने, प्रा. गणेश कुरले, दादासो पाटील, एन. एस. एस. प्रतिनिधी अग्रजा कांबळे, रोहन लाले व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

02 FEB 2026

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाचे ६४९ निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. शनिवारी १३ अभ्यासक्रमांच्या परीक्षा विविध ७ परीक्षा केंद्रांवर झाल्या. या परीक्षांसाठी ८६१ विद्यार्थी उपस्थित होते, तर दिवसभरात १८ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले. शनिवारअखेर ६४९ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात विद्यापीठाच्या परीक्षा विभागास यश आले आहे.

0 2 FEB 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पर्यावरणासाठी लढणाऱ्यांना पाठबळ द्या

## रमेश गावस : विद्यापीठात ‘पर्यावरणीय लढे’ विषयावर व्याख्यान

कोल्हापूर, ता. ३१ : ‘पर्यावरण जोपर्यंत आत्मिक जीवनाशी जोडले जाणार नाही, तोवर पर्यावरणाचे लढे यशस्वी होणार नाहीत’, असे प्रतिपादन गोव्यातील पर्यावरणाचे अभ्यासक रमेश गावस यांनी आज येथे केले. पर्यावरणाचे प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत असून, पर्यावरणासाठी लढणाऱ्यांना पाठबळ द्या, असेही त्यांनी आवाहन केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागात ‘पर्यावरणीय लढे’ विषयावर ते बोलत होते. किर्लोस्कर ऑईल इंजिन आणि लक्ष्मी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम झाला.



पर्यावरण अभ्यासक रमेश गावस.

गावस म्हणाले, ‘पर्यावरणाचे लढे सापेक्ष आहेत. ते उभारण्यासाठी दीर्घकालीन प्रयत्न करावे लागतील. लढणाऱ्या लोकांना पाठबळ द्यावे लागेल. कायदा आणि बुद्धिचातुर्यातून लढ्यांची व्यापक आखणी करावी लागेल. सर्वसामान्य लोकांना पर्यावरण हा विषय क्लिष्ट वाटतो. तो सोप्या शब्दांत सांगावा लागेल. त्यांची संवेदनशीलता वाढविण्यासाठी जाणीपूर्वक प्रयत्न करावे लागतील. परिस्थिती कशीही असली तरी व्यवस्थेच्या विरोधात उभे राहण्याची हिंमत लोकांमध्ये निर्माण करावी लागेल. विविध पातळ्यांवर हे लढे लढावे लागतील, तरच पर्यावरणाचे प्रश्न व्यवस्थेच्या केंद्रस्थानी येतील.’

दुसऱ्या सत्रात ज्येष्ठ पत्रकार प्रभाकर ढगे म्हणाले, ‘देशात अनेक स्मार्ट सिटी होत आहेत. त्या स्मार्ट करण्याच्या नादात पर्यावरणाचा बळी दिला जात आहे. हिमालयाचा ऱ्हास होत आहे. नद्या आणि समुद्राचे प्रदूषण वाढत आहे. पर्यावरणामुळे मानवी आरोग्य धोक्यात आहे. जगभर तंत्रज्ञानाच्या विकासाची गती खूप आहे. हे तंत्रज्ञान आणि मानव यांच्यात सेतू तयार करावा लागेल. धोरण निश्चितीच्या पातळीवर पर्यावरणाला अग्रक्रम द्यावा लागेल. यासाठी पत्रकारांवर मोठी जबाबदारी आहे. पर्यायी माध्यमांचा वापर करून पर्यावरणाच्या प्रश्नांकडे व्यवस्थेचे लक्ष वेधण्यासाठी सर्वांनीच ध्यास घेतला पाहिजे.’ यावेळी पत्रकारिता व जनसंवाद विभागाचे माजी प्रमुख डॉ. रत्नाकर पंडित, डॉ. अनमोल कोठाडिया, सुधाकर निर्मळे, डॉ. सुमेधा साळुंखे, शहीद वीरपत्नी लक्ष्मी महाविद्यालयातील शिक्षक, पत्रकार आणि विद्यार्थी उपस्थित होते. मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. तेजश्री शिंदे हिने सूत्रसंचालन केले. जयप्रकाश पाटील यांनी आभार मानले.

0 2 FEB 2026

तरुण भारत

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**मागील तीन महिन्यांपासून पूर्णवेळ कुलगुरूंची प्रतिक्षा असणाऱ्या शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदासाठी आता निवड प्रक्रिया गतीमान झाली आहे. कुलगुरू पदासाठी इच्छुक असलेल्या आत्तापर्यंत ११५ उमेदवारांनी अर्ज केले आहेत. दाखल झालेल्या अर्जामध्ये विद्यापीठातील १४ जणांचा समावेश आहे. आता या उमेदवारांचे अर्जांच्या छाननीकडे लक्ष लागले आहे. पुढील आठवड्यात छाननीची प्रक्रिया सुरू होणार असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.**

# शिवाजी विद्यापीठास मिळणार नवे कुलगुरु

## कुलगुरू निवड प्रक्रिया गतीमान, आत्तापर्यंत तब्बल ११५ अर्ज दाखल

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या तत्कालीन कुलगुरूंचा कार्यकाळ संपल्यानंतर नवीन कुलगुरूंची निवड होणे अपेक्षित होते. मात्र, कुलगुरूंविनाच विद्यापीठाचे कामकाज सुरू होते. विद्यापीठाच्या इतिहासात प्रथमच कुलगुरूशिवाय कामकाजाची नामुष्की आल्याने प्रशासनाच्या कारभारावर नाराजी व्यक्त करण्यात आली होती. यासाठी अनेक शैक्षणिक संस्थांनी कुलगुरूंच्या निवडीच्या मागणीसाठी जोर लावला होता. यानंतर प्रभारी कुलगुरूंची निवड करण्यात आली होती. मात्र, विद्यापीठाला पूर्णवेळ कुलगुरू मिळावे, अशी मागणी पुढे आली. त्यानुसार आता पूर्णवेळ कुलगुरूंची निवड प्रक्रिया सुरू झाली आहे.

**निवडीसाठी शोध समिती**

कुलगुरू निवडीसाठी कुलपती कार्यालयास कुलगुरू शोध समितीवर विद्यापीठ कायद्यानुसार, व्यवस्थापन परिषद आणि विद्या परिषद या अधिकार मंडळांनी एकत्रितपणे आयआयटी इंदूरचे संचालक प्रा. सुहास जोशी यांना नामनिर्देशन केले. त्यांनी समिती सदस्य म्हणून काम करण्यासाठी संमती दिली. त्यानंतर शोध समिती स्थापन झाली.

### विद्यापीठातील १४ जण इच्छुक

### लवकरच छाननी प्रक्रियेला प्रारंभ



शोध समितीने २३ डिसेंबर रोजी कुलगुरुपदासाठी इच्छुक असणाऱ्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरू केली होती. अर्ज करण्यासाठी मंगळवार, दि.२७ जानेवारी रोजी संध्या. ५ पर्यंत मुदत देण्यात आली होती. या मुदतीत विद्यापीठ कार्यक्षेत्रासह राज्यातून साधारणतः ११५ उमेदवारांनी अर्ज केले आहेत. त्यांनी स्वतःची माहिती निवडणूक प्रक्रियेतील नोडल ऑफिसर प्रा. एस. सरवनन यांना सादर केली आहे.

कुलगुरूपदासाठी अर्ज दाखल करण्यास चांगला प्रतिसाद मिळाला आहे. आता अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली असून दाखल झालेल्या अर्जांची छाननी होणार आहे. छाननीनंतर त्यातील पाच उमेदवारांची नावे कुलपतींकडे अंतिम मुलाखत प्रक्रियेसाठी समितीकडून सादर केली जाणार आहेत. त्यामुळे लवकरच विद्यापीठाला नवे कुलगुरू मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

**अर्ज करणारे उमेदवार**

शिवाजी विद्यापीठाचे विद्यमान प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. एस. एस. चव्हाण, सागर डेळेकर, एस. एस. कोळेकर, के. एम. गरडकर, अनिल घुले, जी. बी. कोळेकर, आर. व्ही. गुरव, आर. जी. सोनकवडे, एस. एस. महाजन, ज्ञानदेव तळुले, नीशा मुडे-पवार, एम. एस. देशमुख, रामचंद्र पवार, तर विद्यापीठ बाहेरील अन्य उमेदवारांमध्ये होमीभाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत, शिवाजी विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, माजी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, मुंबईतील मितीन देसाई, नितीन सरदेसाई यांची नावे आहेत.

0 2 FEB 2026

पुढारी

केंद्रीय अर्थसंकल्पात प्रत्येक जिल्ह्यात मुलींसाठी वसतिगृह स्थापन करण्याचा निर्णय स्तुत्य आहे. शैक्षणिक संस्थांना पाठिंबा दिल्यास आधार मिळेल. विदेशी शिक्षणासाठी आर्थिक सवलतीमुळे विद्यार्थ्यांच्या पालकांना दिलासा मिळेल.

- डॉ. ज्योती जाधव, प्रभारी प्र-कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

02 FEB 2026

सकाळ

# 'प्रगत अनुदेशन पद्धतीद्वारे कौशल्य निर्मितीची गरज'

कोल्हापूर, ता. १ : शिक्षणशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ येथे प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत (पीएम.उषा) 'प्रगत अनुदेशन पद्धती' यावर दोन दिवसीय कार्यशाळा झाली. स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी विभागाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. किरणकुमार शर्मा यांनी सद्य:स्थितीत बदलत्या सामाजिक गरजा लक्षात घेऊन शिक्षणपद्धतीमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे, असे सांगितले. शिक्षणशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांनी प्रगत अनुदेशन पद्धतीचे महत्व सांगितले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथील माहिती तंत्रज्ञान विभागाचे संचालक डॉ. नितीन पाटील, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ मुंबई येथील डॉ. महेश कोलतामे, शिक्षणशास्त्र विभाग सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथील डॉ. वैभव जाधव, एमआयटी.एडीटी विद्यापीठ पुणे येथील डॉ. प्रिया सिंग, प्राणीशास्त्र अधिविभाग येथील प्रा. डॉ. एम. पी. भिलावे यांनी प्रगत अनुदेशन पद्धती यावर मार्गदर्शन केले.समन्वयक डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी इतिवृत्तांत सादर केला.

0 2 FEB 2026

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात संत रविदास महाराज यांची जयंती उत्साहात

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात संत रविदास महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे प्रमुख डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. केदार मारुलकर, डॉ. तेजपाल मोहरेकर, संशोधन छात्र व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

0 2 FEB 2026

जनसंपर्क कक्ष

सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात संत रविदास जयंती

कोल्हापूर, ता. १ : शिवाजी विद्यापीठात आज संत रविदास महाराज जयंती साजरी झाली. मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे प्रमुख डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. केदार मारुलकर, डॉ. तेजपाल मोहरेकर, संशोधन छात्र, विद्यार्थिनी उपस्थित होते.

